दैनिक
# सह्याद्रीचा राखणदार

www. sahyandrinews.com

Scan QR code to visit... Epaper Portal

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ ले • अंक १५९ • Title - Code :- MAHMAR49513 • सोमवार दि.११ मार्च २०२४ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# येत्या १४ वा १५ मार्चला लोकसभा निवडणुकीच्या तारखांची घोषणा?

## आयोगाच्या जम्मू-काश्मीर दौऱ्यानंतर निर्णयाची शक्यता




**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)**–केंद्रीय निवडणूक आयोगाचा जम्मू-काश्मीरचा पाहणी दौरा झाल्यानंतर १४ वा १५ मार्च रोजी लोकसभा निवडणुकीच्या तारखांची घोषणा केली जाण्याची शक्यता आहे. आयोगाने बहुसंख्य राज्यांचा निवडणूकपूर्व आढावा घेतला असून सोमवार ते बुधवार (११ ते १३ मार्च) या तीन दिवसांत तीनही निवडणूक आयुक्त जम्मू विभाग तसेच काश्मीर खोऱ्याला भेट देतील.

केंद्रीय गृह मंत्रालयाने केंद्रीय निवडणूक आयुक्तांना जम्मू व काश्मीरमधील कायदा-सुव्यवस्थेसंदर्भात दोन दिवसांपूर्वी झालेल्या बैठकीमध्ये संपूर्ण माहिती पुरवलेली आहे. गृह मंत्रालयाने दिलेल्या तपशिलाच्या आधारे केंद्रीय निवडणूक आयोग जम्मू व काश्मीर या दोन्ही विभागांचा आढावा घेईल. सर्वोच्च न्यायालयाने जम्मू व काश्मीरमध्ये विधानसभा निवडणूक घेण्यासंदर्भात केंद्रीय निवडणूक आयोगाला आढावा घेण्याचे आदेश दिले होते. आयोगाला ३० सप्टेंपर्यंत विधानसभेची निवडणूक घेण्याचे आदेशही न्यायालयाने दिले आहेत. त्यामुळे आयोगाकडून लोकसभा निवडणुकीच्या निमित्ताने विधानसभा निवडणुकीचीही तयारी केली जात असल्याचे समजते. दोन्ही निवडणुका एकाचवेळी घेण्यासंदर्भात आयोगाने अजून निर्णय घेतलेला नाही. मात्र, येत्या आठवडय़ातील आयोगाच्या भेटीमध्ये दोन्ही निवडणुका एकत्र घेण्याइतके अनुकूल वातावरण आहे का, याची चाचपणी केली जाणार आहे.आगामी लोकसभा निवडणुकीपूर्वी केंद्रीय निवडणूक आयोगाचा जम्मू-काश्मीरचा दौरा हा राज्यांचा अखेरचा दौरा असेल. आयोगाने उत्तर प्रदेश तसेच, पश्चिम बंगालचाही आढावा घेतला आहे. त्यामुळे जम्मू-काश्मीरहून दिल्लीत परतल्यानंतर आयोग तातडीने लोकसभा निवडणुकीचा कार्यक्रम घोषित करेल असे समजते.

अंदाज काय?

'लोकसभा निवडणुकीच्या तारखा जाहीर झाल्याक्षणी आचारसंहिता लागू होते. त्यापूर्वीच पंतप्रधान नरेंद्र मोदींना १२ राज्यांचे झंझावाती दौरे पूर्ण करावे लागतील. '१३ मार्च हा मोदींच्या निवडणूकपूर्व दौऱ्याचाही अखेरचा दिवस असेल. त्यापूर्वी ११ वा १२ मार्च रोजी केंद्रीय मंत्रिमंडळाची बैठकही होण्याची शक्यता.'या बैठकीमध्ये महत्त्वाच्या घोषणा केल्या जाण्याची अपेक्षा असून विविध मंत्रालयांनी याआधीच विविध योजना जाहीर केल्या आहेत.

# पुलगाव अतिक्रमणावर चालले गजराज

**पुलगाव । प्रतिनिधी**

येथे १० मार्चला अतिक्रमण हटविण्याची मोहीम राबविण्यात आली. देवळी नाका ते स्टेशन चौकापर्यंत राबविण्यात आली. याबाबत माहिती अतिक्रमणधारकांना अवगत असल्यामुळे मोठ्या प्रमाणात अतिक्रमणे , अतिक्रमण धारकांनीच काढली होती.दोन जेसीबीच्या साह्याने महसूल विभाग, नगरपरिषद, सार्वजनिक बांधकाम विभाग,पोलीस विभाग तसेच इतर विभागाच्या संयुक्त मोहिमेअंतर्गत ही कारवाई करण्यात आली. स्टेशन चौक ते वर्धा रोड या भागात येणाऱ्या ग्रामीण रुग्णालय,पोलीस स्टेशन, बस स्थानक, विश्रामगृह या भागातील अतिक्रमणे काढण्यात आली.

यावेळी मोठ्या प्रमाणात नागरिक तसेच प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी होते. यावेळी दंगल नियंत्रक पथकाला पाचारण्यात आले होते.यावेळी नगरपालिकेचे मुख्याधिकारी विजय आश्रमा, सहाय्यक पोलीस अधीक्षक राहुल चव्हाण, नायब तहसीलदार अजय झिले, ठाणेदार प्रमोद बाळगुले, पोलीस उपनिरीक्षक संदीप एकबोटे, सदानंद वडतकर, सोनकुसरे, जाधव तसेच महसूल विभागाचे डेहनकर, हांडे, भरणे उपस्थित होते.

रेल्वे स्टेशन ते आर्वी रेल्वे गेट पर्यंत मोठ्या प्रमाणावर अतिक्रमण आहे.परंतु एकाच मार्गांवरील अतिक्रमण धारकांनी आपली अतिक्रमणे काढली नाही. प्रशासनाने याला हातही लावला नाही. याबद्दल आश्चर्य व्यक्त करण्यात येते. स्वातंत्र्यानंतर सिंधी बांधवानी अनेक वर्षे रोजगाराचे साधन म्हणून येथे दुकानें लावली होती. परंतु मागील अतिक्रमण



हटाव मोहिमेत अनेक विनंती, आर्जवांनंतरही अतिक्रमण काढण्यात आले. परंतु नविन अतिक्रमण रेल्वे भिंत व रस्ता यामध्ये असुन वाहतुकीला अडथळा असताना त्यावर प्रशासन मेहरबान का.हे कळायला मार्ग नाही.

तसेच काढलेले अतिक्रमण किती दिवस मोकळे राहणार. प्रशासन आपली जागा सुरक्षित करण्यासाठी काय उपाय करणार.मुळात पोलिस, सार्वजनिक बांधकाम विभाग, नगर परिषद, तहसील कार्यालय यांच्या समोर अतिक्रमण करायची हिम्मतच कशी होते.यावरून प्रशासनाची पकड ढिली असल्याचे निदर्शनास येते. याचे जिवंत उदाहरण पाहायचे असेल तर सोमवार बाजाराचे दिवशी आठवडी बाजाराची जागा सोडून तहसील कार्यालयाभोवती, तसेच आठवडी बाजार ते भगतसिंग पुतळ्यापर्यंत रस्त्यावरच बाजार भरतो. वाहने तर दूर पायी चालणे कठीण असते.यावर प्रशासन केव्हा कारवाई करणार. याकडे पुलगावकरांचे लक्ष लागले आहे.

## घरकुल बांधकामाला कर्जाचा मुलामा


# शासनाने अनुदानात वाढ करावी तुटपुंजा निधीतून घरकुल अशक्य

**चिमूर । प्रतिनिधी**

प्रत्येकाला स्वतःची घर असावे, अशी इच्छा प्रत्येक नागरिकाची असते परंतु शासनाच्या उदासीनतेमुळे व वाढत्या महागाईमुळे ग्रामीण जनतेच्या स्वप्नांच्या घरांना तळा पडताना दिसत आहे.

दारिद्र रेषेखालील जीवन जगणाऱ्या नागरिकांसाठी शासन पंतप्रधान आवास योजना, शबरी महामंडळ योजना, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, रमाबाई आवास योजना, अशा विविध योजना राबवत असून घर बांधकामासाठी अनुदान तटपुंजे असल्याने लाभार्थ्यांना महागाई मध्ये घर बांधताना कर्जबाजारी व्हावे लागत आहे.

दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाकरता जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या अर्थसाहाय्यातून पंचायत समिती स्तरावर रमाई घरकुल योजना, पंतप्रधान आवास योजना राबवली जात आहे. तसेच आदिवासी विकास प्रकल्पातर्फे शबरी घरकुल योजना राबवली जात आहे. परंतु शासनाकडून देण्यात येणारे अनुदान अपुरे पडत असल्याने लाभार्थ्यांना घर बांधकामासाठी कर्ज काढावे लागत आहे. नातेवाईक व सावकार, विविध प्रायव्हेट बँका, सोसायटी, मित्रमंडळी यांच्याकडून व्याजाने घर बांधकामासाठी रक्कम



घ्यावी लागत आहे.

ग्रामीण परिसरात पंतप्रधान आवास योजना, शबरी, व रमाई घरकुल योजनेसाठी शासनाकडून जवळपास १.लाख ४८ हजार रुपयाचे अनुदान मिळत असून काही अनुदान ग्रामीण रोजगार हमी योजना अंतर्गत मिळत असते, परंतु बऱ्याच लाभार्थ्यांना घर बांधताना वेळेवर अनुदान मिळत नाही ही मात्र शोकांतिका आहे.

घरकुल योजनेला शौचालय बांधणे अनिवार्य असून शौचालय नसल्यास उर्वरित रक्कम लाभार्थ्याला मिळत नाही. परंतु घरकुल बांधकामासाठी मिळत असलेला निधी यामध्ये फक्त संडास बाथरूम चे काम होऊ शकते. आजच्या परिस्थितीत घर बांधकाम साहित्याचे भाव गगनाला भिडले असून सिमेंट ३५० रू. बॅग, लोखंड ५४ ते ५५ हजार क्विंटल, गिट्टी ४००० रू.,शंभर फुट, रेती ५ ते ६ हजार रू. ट्रॅक्टर खिडे, तार, शंभर रुपये किलो, घर बांधकाम मिस्त्री सहाशे रुपये, हेल्पर ४०० रुपये, तर सेंट्रींग १२ ते १४ स्केअर फिट असून घर बांधकामाला जवळपास तीन लाख रुपये लागत असल्याने महागाईच्या काळात लाभार्थ्यांना घर बांधकामासाठी परवडण्यायोग्य नाही. शासनाने मोफत वाळूचा जी आर काढला असून सहा ब्रास रेती घर बांधकामासाठी देण्याचा निर्णय घेतला परंतु अजून पर्यंत त्याची युद्ध पातळीवर अंमलबजावणी करण्यात आली नसल्याने न सुटणारे कोडेच आहे. तसेच ग्रामपंचायत अंतर्गत घरकुल योजनेच्या ड यादी मधील मोठ्या प्रमाणात गरजू लाभार्थ्यांची नावे गायब झाली असून त्याचे काय होणार हा प्रश्नच निर्माण झालेला आहे ? शासनाने वाढत्या महागाईचा विचार करून अनुदान वाढ करावी अशी मागणी तालुक्यातील घरकुलधारकांमध्ये जोर धरत आहे.

# वडनेर भागात वाळू चोरीचा 'रात्रीस खेळ चाले'

## वेणा,वर्धा,यशोदेसह मोठे नाले पोखरले

**वडनेर । प्रतिनिधी**

हिंगणघाट तालुक्यात येणाऱ्या वडनेर भागातून वाहणाऱ्या नदी आणि नाल्यांच्या पात्रातून वाळूची तस्करी दररोज केली जात आहे. या प्रकाराला राजकीय आणि प्रशासकीय यंत्रणेची साथ लाभत आहे. यांची साठगाठ असल्याची चर्चा आहे. लिलाव झालेल्या आणि लिलाव नसलेल्या अनेक ठिकाणावरून दररोज शेकडो ब्रास रेतीचा उपसा केला जात आहे.असा आढावाच जनतेने सादर केल्या असून 'रात्रीस खेळ चाले' या चर्चांना उधाण आले आहे.

हिंगणघाट तालुक्यातील वडनेर पोलीस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या या भागातून वर्धा, वेणा, यशोदेसह अनेक मोठे नाले आहेत. या भागातील कुटकी, दारोडा, टेंभा, दोंदुडा, शेकापूर, येळी, पोहना, बोपापूर, आजनसरा हिवरा, टाकळी, निधा, मनसावळी याशिवारातील नदीपात्रातून वाळू तस्करांकडून मोठ्या प्रमाणात दिवसा आणि रात्री वाळूची चोरी होत आहे. मात्र, तहसीलदार, मंडळ अधिकारी, तलाठी यांचे याकडे दुर्लक्ष आहे. गत अनेक दिवसांपासून ही वाळु या भागातील गाव खेड्यात तसेच शिरजगाव अल्लीपूर हिंगणघाट वर्धा या मार्गाला जात आहे. यासाठी महसूल आणि पोलीस यंत्रणेचे छुपे पाठबळ मिळत असल्याने वाळू तस्कर आपले



काम फत्ते करीत आहे. महसूल यंत्रणा कुठे प्रामाणिक पणे तर कुठे देखाव्यासाठी कारवाईचा बागुलबुवा उभा करताना दिसत आहे.

### लोकेशनसाठी चोरट्यांचे चौकीदार

वाळूची तस्करी रोखण्यासाठी गेली काही वर्षात महसूल विभाग अनेक ठिकाणी चौकी उभारून कर्मचाऱ्यांना चौकीदार म्हणून उभे केले जात असे. मात्र, यावर्षी तसे घडत नसून चौकीदारच चोर बनल्याची चर्चा जनमानसात आहे. मात्र, त्या ऐवजी चोरट्यांचे चौकीदार लोकेशनचे कनेक्शन देण्यासाठी उभे ठाकल्याचे चित्र आहे. वडनेर येथे पोलीस ठाणे आहे. परंतु, काळोखात चालणाऱ्या वाळू तस्करीच्या खेळात महसूल आणि पोलीस यंत्रणेला हाताशी धरून राजरोजपणे वाळूचा काळा कारभार वाळू तस्करांकडून सुरू असला तरी अधून मधून काही अधिकारी धाडसत्र राबवतात. ते आपल्या आड येऊ नयेत, याची खडा न खडा माहिती आपल्यापर्यंत पोहोचावी, याकरिता तस्करांनी लोकेशन मिळविण्यासाठी सुक्ष्म यंत्रणा कार्यान्वित केली आहे. त्यांचा हा सारा खेळ मोबाईल लोकेशनवर चालतो. शासकीय यंत्रणेपेक्षाही कितीतरी पट जलद गतीने तस्करांची यंत्रणा चालते. लोकेशन मुळे भरलेली वाहने सुसाट धावतात. मोबाईलमुळे वाळू तस्करांचा अवैध धंदा सोईस्कर बनला आहे. त्यांचे खबरीलाल मोबाईलवर संवाद साधून कुणी अधिकारी, कर्मचारी या रस्त्याने येत असल्याची माहिती क्षणात पोचवितात. त्यामुळे अडथळा निर्माण होत नाही. वाहनांचा मार्ग बदलला जातो. वाळू तस्करी करताना बारकाईने लक्ष ठेवण्यासाठी वडनेर भागात अनेक गावालगत महामार्गावर तस्करांनी काही पॉईंट नेमून तिथे चौकीदार ठेवून सारा खेळ मोबाईल लोकेशनने चालवितात. या भागातील नदी नाल्यांच्या पात्रातील विविध ठिकाणाहून वाळू उपसून वाहतूक केली जातात आतापर्यंत हजारो ब्रास वाळू वाळूमाफियांनी आपल्या घशात घातली आहे.

# महिला शेतकरी कुसुम झाडे यांना विभागीय पुरस्कार

## सन २०२१-२२मध्ये जिल्ह्यात सर्वोत्तम कामगिरी



**सिंदीरेल्वे । प्रतिनिधी**

येथील महिला शेतकरी कुसुम प्रमोद झाडे यांना गत आठवड्यात नागपूर येथील विभागीय कृषि कार्यालयातर्फे आयोजित एका सोहळ्यात जिजामाता कृषिभूषण पुरस्कार देवून गौरवान्वित करण्यात आले.यापूर्वी कुसुमताईला अनेक पुरस्कार मिळाले आहेत,त्यात पुन्हा या पुरस्काराची भर पडली आहे.

मागील ३२ वर्षांपासून कुसुम झाडे यांनी आपल्या तसेच पती प्रमोद झाडे यांच्या नावाने असलेल्या अल्प शेतीत नवनवीन प्रयोग करुन भरपूर उत्पन्न घेतले आहे.परंपरागत शेतीला छेद देऊन त्यांनी विषमूक्त शेतीची कास धरली.मूठभर शेतीत त्यांनी फळे,फुले भाजीपाला तसेच सोयाबीन व गव्हाचे पीक सेंद्रीय पध्दतीने घेतले.विशेष म्हणजे शेतातील फुले किंवा भाजीपाला विकण्यासाठी त्या खुद्द गांधी चौकात रोज दुकान लावतात.किटकांचा बंदोबस्त करण्यासाठी कुसुमताई केवळ निंबोळी अर्क तयार करुन वापरतात.गांढूळ खत निर्मितीसाठी त्यांनी शेतातच व्यवस्था केली आहे.त्यांच्या प्रयोगशील शेतीची पाहणी दरवर्षी तालुका,जिल्हा कृषि अधिकारी करतात.यंदा नागपूर विभागात हा पुरस्कार अनेक मान्यवर तसेच जिल्हाधिकारी राहूल कर्डिले यांच्या उपस्थितीत प्रदान करण्यात आला आहे.वर्धा जिल्ह्यातून यंदा तीन अन्य शेतकऱ्यांचा देखील सन्मान करण्यात आला.

# आ.किशोर जोरगेवार यांच्या प्रयत्नांनी मंजूर १५० कोटी रुपयांच्या १९२ विकास कामांच्या भुमिपूजनाला सुरवात

## कार्यकर्त्यांना भूमिपूजनाचा मान, भूमिपूजनाचा विक्रम, चार दिवस चालणार भूमिपूजन सोहळा

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

आमदार किशोर जोरगेवार यांच्या प्रयत्नांतून विविध विभागाच्या निधी अंतर्गत मंजुर मतदार संघातील १५० कोटी रुपयांच्या १९२ विकासकामांच्या भूमिपूजनाला आज सुरवात झाली असून आज ८८ कामांचे भूमिपूजन करण्यात आले आहे. विशेष म्हणजे या सर्व भुमिपूजनाचा मान आमदार किशोर जोरगेवार यांनी कार्यकर्त्यांना दिला आहे. या विकासकामांमुळे नागरिकांच्या सोयी सुविधेत भर पडणार आहे. सदर भूमिपूजन सोहळा पुढील चार दिवस चालणार असून हा भूमिपूजनाचा विक्रम असल्याचे बोलल्या जात आहे.




चंद्रपूर विधानसभा क्षेत्राचे अपक्ष आमदार किशोर जोरगेवार यांनी मतदार संघाच्या विकासासाठी मोठा निधी खेचुन आणला आहे. या निधीतून शहरी भागासह ग्रामीण भागात विकासकामे केल्या जात आहे. मतदार संघात अभ्यासिका आणि समाज भवन तयार करण्यावर आमदार किशोर जोरगेवार यांचा भर राहिला आहे. त्यांच्या प्रयत्नातून मतदार संघात ११ अभ्यासिका तयार केल्या जात आहे. तर ग्रामीण भागासह शहरी भागातही मोठ्या प्रमाणात समाज भवनांचे काम सुरु आहे. दरम्यान विविध विभागाच्या निधी अंतर्गत आमदार किशोर जोरगेवार यांनी तब्बल १५० कोटी रुपयांचा निधी मंजुर करुन आणला आहे. या निधीतुन ग्रामीण व शहरी भागातील १९२ विकास कामे केल्या जाणार आहे. आज रविवारी आमदार किशोर जोरगेवार व त्यांच्या कार्यकर्त्यांच्या हस्ते विविध ठिकाणी सदर कामांचे भुमिपूजन करण्यात आले आहे. हा भुमिपूजनाचा विक्रम असुन या कामांमुळे नागरिकांच्या सोयी सुविधेत भर पडणार आहे.चंद्रपूरच्या जनतेने अपक्ष आमदार म्हणून देशात सर्वाधिक मत्ताधीक्क देत मला निवडून पाठविले आहे. स्वाभाविकच त्यांच्या अपेक्षा माझ्याकडून आहेत. त्यामुळे नागरिकांना हवे त्या कामाला प्राधाण्य देण्याचा प्रयत्न आपला राहिला आहे. माझा कोणता पक्ष नाही. मात्र चंद्रपूरची जनता आणि कार्यकर्ते हा माझा पक्ष आहे. त्यामुळे आपण मंजूर केलेल्या १९२ विकासकामांचे भुमिपूजन कार्यकर्त्यांच्या हस्ते करत आहोत. याच कार्यकर्त्यांच्या माध्यमातून प्रभागातील समस्या आमच्या प्रयत्न पोहचत असतात. त्यामुळे त्यांचा व त्यांच्या कार्याचा हा सन्मान असल्याचे ते यावेळी म्हणाले. आपण अपक्ष आमदार म्हणून निवडून पाठविले आहे. मात्र अपक्ष असुनही आपण चंद्रपूरच्या विकासासाठी कधिही निधी कमी पडू दिला नाही. आवश्यक त्या सर्व गोष्टींसाठी आपण निधी उपलब्ध करुन दिला आहे. चंद्रपूरात सुरु झालेला विकासाचा झंझावात थांबणारा नाही. पूढेही आपण नागरिकांना अपेक्षित असलेल्या कामांसाठी निधी उपलब्ध करुन देऊ असेही ते यावेळी म्हणाले.यावेळी बाबुपेठ, जुनोना चौक, भिवापूर, पठाणपुरा, जलगनर, तुकुम, वडगाव, रहमत नगर, मोहम्मदीया नगर, बंगाली कॅम्प, इंदिरा नगर, संजय नगर, दाताळा, वृंदावन नगर, तुलसी नगर, राष्ट्रवादी नगर, येरूर, घुग्गुस यासह शहरातील व ग्रामीण भागातील विविध ठिकाणचे भुमिपूजन करण्यात आले. या कार्यक्रमांना स्थानिक नागरिक व कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# मराठा साम्राज्याचे दुसरे शासक!

**छत्रपती संभाजी महाराजांनी आपल्या शौर्याने आपले नाव भारताच्या इतिहासाच्या पानावर सुवर्ण अक्षरांनी कोरले होते. कारण मुघल सम्राट औरंगजेबाच्या लाखो क्रूरता आणि प्रयत्नांनंतरही संभाजींनी धर्म बदलला नाही. त्यामुळे वयाच्या अवघ्या ३१व्या वर्षी क्रूर औरंगजेबाने संभाजी महाराजांची हत्या केली. लहानपणापासून ते मुघल साम्राज्याच्या विरोधात असायचे. त्यामुळं महाराजांचं साम्राज्य मुघल, सिंधी, म्हैसूर आणि पोर्तुगालमध्ये पसरलं होतं. याहून अधिक रोचक व रोमांचक माहिती श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींच्या सदर संकलित लेखातून वेचून घ्याच... संपादक.**

मराठा साम्राज्याचे दुसरे शासक आणि शिवाजी महाराजांचे ज्येष्ठ पुत्र संभाजी भोंसले यांचा जन्म दि.१४ मे १६५७ रोजी पुण्याजवळील पुरंदर किल्ल्यावर झाला. छत्रपती संभाजी महाराज हे औरंगजेबाचे सर्वात शक्तिशाली प्रतिस्पर्धी होते. त्याने मुघल साम्राज्यातील दोन महत्त्वाचे किल्ले, विजापूर आणि गोलकोंडा आपल्या स्नायूंच्या बळावर हल्ला करून काबीज केले होते. छत्रपती संभाजी महाराजांनी आपल्या शौर्याने आपले नाव भारताच्या इतिहासाच्या पानावर सुवर्ण अक्षरांनी कोरले होते. कारण मुघल सम्राट औरंगजेबाच्या लाखो क्रूरता आणि प्रयत्नांनंतरही संभाजींनी धर्म बदलला नाही. त्यामुळे वयाच्या अवघ्या ३१व्या वर्षी क्रूर औरंगजेबाने संभाजी महाराजांची हत्या केली. लहानपणापासून ते मुघल साम्राज्याच्या विरोधात असायचे. त्यामुळं महाराजांचं साम्राज्य मुघल, सिंधी, म्हैसूर आणि पोर्तुगालमध्ये पसरलं होतं.

लहानपणी संभाजी महाराजांचे संगोपन त्यांच्या आजी दादी जिजाबाई यांनी केले. कारण संभाजी महाराजांनी वयाच्या अवघ्या दुसऱ्या वर्षी आई सईबाई गमावल्या होत्या. संभाजी महाराजांचे दुसरे नाव चावा. मराठी भाषेत छावा म्हणजे सिंहाचे बाळ. संभाजी महाराजांच्या शिक्षणाविषयी सांगायचे तर महाराजांना संस्कृतसह १३ भाषांचे ज्ञान होते. घोडेस्वारी, धनुर्विद्या आणि तलवारबाजी यात ते लहानपणापासूनच निपुण होते. संभाजींनी अनेक शास्त्रेही लिहिली होती. वयाच्या अवघ्या ९व्या वर्षी संभाजी राजे यांना अंबरचा राजा जयसिंग यांच्याकडे राहायला पाठवण्यात आले. कारण तो राजकीय दावे मोठ्या समजुतीने शिकतो.

संभाजी महाराज हे भारताचे महाराजा वीर छत्रपती शिवाजी यांचे पुत्र होते. त्यांच्या आईचे नाव सईबाई होते. सईबाई या छत्रपती शिवरायांच्या दुसऱ्या पत्नी होत्या. संभाजी राजेंच्या कुटुंबात आई-वडिलांशिवाय आजोबा शहाजी राजे, आजी जिजाबाई आणि भावंडे होते. त्यांचे वडील शिवाजी महाराजांना तीन बायका होत्या. सईबाई, सोयराबाई आणि पुतलाबाई अशी तिची नावे होती. संभाजी महाराजांचे एक भाऊ राजाराम छत्रपती होते. तो सोयराबाईचा मुलगा होता. त्याशिवाय महाराजांना शकूबाई, अंबिकाबाई, राणूबाई जाधव, दीपाबाई, कमलाबाई पालकर आणि राजकुंवरबाई शिर्के या बहिणी होत्या. संभाजी महाराजांचा विवाह येसूबाईशी झाला. त्यांना छत्रपती साहू नावाचा मुलगा आणि भवानीबाई नावाची मुलगी देखील होती. छत्रपती संभाजी महाराज आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्यात चांगले संबंध नव्हते. संभाजींचे बालपण अडचणीत आणि प्रतिकूल परिस्थितीत गेले. संभाजीची सावत्र आई सोयराबाईला आपला मुलगा राजाराम याला शिवाजीचा उत्तराधिकारी बनवायचा होता. त्यामुळे छत्रपती शिवाजी आणि संभाजी यांचे संबंध बिघडले होते. संभाजी महाराजांनी अनेक वेळा शौर्य दाखवले होते. पण शिवाजी आणि त्याच्या कुटुंबाचा संभाजीवर विश्वास नव्हता. शिवाजी महाराजांनीही एकेकाळी शिक्षा दिली होती. पण तो निसटला आणि मुघलांमध्ये सामील झाला. त्या काळात शिवाजी महाराजांच्या अडचणी वाढल्या होत्या. पण संभाजींनी पाहिले की मुघल हिंदूंवर अत्याचार करतात. म्हणून तो मुघलांची बाजू सोडून परत शिवाजीकडे माफी मागायला आला.

छ.संभाजी महाराज लहानपणी मुघल शासक औरंगजेबाच्या कैदेतून सुटले होते. त्यावेळी शिवाजी महाराजांचे मंत्री रघुनाथ कोरडे यांच्या एका दूरच्या नातेवाईकाकडे तो जवळपास दीड वर्ष अज्ञातवासात राहत होता. त्या काळात संभाजी काही काळ ब्राह्मण मुलगा म्हणून राहिले आणि महाराजांचे उपनयन संस्कारही मथुरेतच झाले. त्यावेळी ते संस्कृतही शिकले आणि मग संभाजीची ओळख कवी कलश यांच्याशी झाली. असे म्हटले जाते. संभाजी महाराजांचा उग्र आणि बंडखोर स्वभाव फक्त कवी कलशच हाताळू शकला. संभाजी महाराजांची साहित्य निर्मिती- बुधभूषणम, नायिकाभेद, सातशातक, नखशिखान्त, श्रृंगारिका ही होती.

संभाजी महाराजांनी वयाच्या १६व्या वर्षी आयुष्यातील पहिले युद्ध लढले. त्यात महाराजांचा



विजय झाला. महाराज युद्धात ७ किलो वजनाची तलवार घेऊन लढायचे. त्यांचे वडील छ.शिवाजी महाराज यांचे सन १६८१ मध्ये निधन झाले. त्यानंतर त्यांनी कधीही मागे वळून पाहिले नाही आणि सर्वात



श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.
मु.पो.ता.जि.गडचिरोली
दूरभाष- ७७७५०४१०८६.

मोठा शत्रू औरंगजेबाला त्रास दिला. छत्रपती संभाजी महाराजांनी आयुष्यात १२० लढाया केल्या. त्यानंतरही महाराजांचा एकाही लढाईत पराभव झाला नाही. त्याने सर्व लढाया जिंकल्या.

छ.शिवाजी महाराजांचा मृत्यू झाला तेव्हा मराठ्यांना अनेक संकटांचा सामना करावा लागला. त्या परिस्थितीत संभाजींनी राज्याची जबाबदारी घेतली. संभाजी महाराजांचे भाऊ राजाराम यांना गादीवर बसवण्यासाठी अनेकांनी प्रयत्न केले. मात्र सेनापती हंबीरराव मोहिते यांच्यासमोर त्यांना यश आले नाही. दि.१६ जानेवारी १६८१ रोजी संभाजी महाराजांचा राज्याभिषेक झाला. सम्राट औरंगजेब हा त्यावेळी मराठ्यांचा सर्वात मोठा शत्रू होता. त्यावर्षी औरंगजेब दक्षिणेकडील पठारावर आला. सन १६८२मध्ये औरंगजेबाने ५४ लाख प्राण्यांच्या सैन्यासह रामसे किल्ल्याला वेढा घालण्याचा प्रयत्न केला. पण यश मिळू शकले नाही. संभाजी महाराजांनी आयुष्यभर हिंदू धर्माच्या हितासाठी मोठे यश संपादन केले होते. त्यांनी औरंगजेबाच्या प्रचंड सैन्याला तोंड देत मुघलांचा पराभव केला. त्यांनी उत्तर भारतातील हिंदू राज्यकर्त्यांना औरंगजेबापासून त्यांचे राज्य परत मिळवून शांतता प्रस्थापित करण्यास मदत केली. त्यांच्यामुळेच शूर मराठे आणि संपूर्ण राष्ट्रातील हिंदू त्यांचे ऋणी आहेत. संभाजी महाराजांचे सर्वात मोठे यश म्हणजे त्यांचे राज्य हिंदू राजांना परत मिळवून देणे.

संभाजी आणि इतर राजांमुळे औरंगजेबाने दक्षिणेत २७ वर्षे लढा दिला, तोपर्यंत उत्तरेकडील बुंदेलखंड, पंजाब आणि राजस्थान या हिंदू राज्यांमध्ये हिंदू धर्माचे रक्षण झाले. महाराष्ट्रातील किंवा देशाच्या पश्चिम घाटातील मराठा सैनिक आणि मुघलांना हे शक्य झाले नाही. परंतु संभाजी राजे केवळ बाह्य आक्रमकांपासूनच नव्हे तर राज्यातील शत्रूंकडूनही पडले. त्यावेळी शूर मराठे आणि मुघलांच्या रक्ताने पृथ्वी सतत भिजलेली होती.

सन १६८९मध्ये मुघलांची दहशत वाढली आणि मुकर्रब खानने हल्ला केला. त्यात मुघल सैन्य राजवाड्यात पोहोचले आणि संभाजी महाराज आणि कवी कलश यांना कैद केले. दोघांनाही तुरुंगात डांबण्यात आले आणि त्यांना इस्लाम स्वीकारण्यास फर्मावले गेले. औरंगजेबाने छ.संभाजींना पाहिल्यावर तो सिंहासनावरून खाली आला आणि म्हणाला, शिवाजीचा मुलगा माझ्यासमोर उभा राहणे ही माझ्यासाठी मोठी उपलब्धी आहे. आणि त्याला त्याच्या अल्लाहची आठवण झाली. कवी कलश यांनाही बेड्या घालण्यात आल्या होत्या. तरीही तो म्हणाला, की बघ मराठी राजा, तो स्वतः सिंहासनावरून उठला आणि तुला नमस्कार केला आहे. हे ऐकून औरंगजेबाला राग आला. मुघलांनी संभाजीला सांगितले, की जर त्याने राज्य आणि किल्ला मुघलांना दिला तर तो त्याला जिवंत ठेवू शकतो. पण वीर संभाजींनी नकार दिला. औरंगजेब म्हणाला, की संभाजींनी इस्लाम स्वीकारला तर ते शांततेत राहू शकतील. पण ते संभाजीला मान्य नव्हते. तेव्हा मुघलांनी संभाजी आणि कवी कलश यांच्यावर अनेक अत्याचार केले होते. संभाजी महाराज आणि कवी कलश यांनी इस्लाम स्वीकारण्यास नकार दिल्याने औरंगजेब खूप संतापला होता. संभाजी महाराजांच्या जखमेवर मीठ चोळले. त्यानंतर, त्याला त्याच्या सिंहासनावर ओढण्यास सांगितले गेले. त्यावेळी औरंगजेबाने संभाजी महाराजांची जीभ कापून सिंहासनासमोर ठेवली आणि कुत्र्यांना खाऊ घालण्याचा आदेश दिला. एवढे सगळे होऊनही संभाजी हसत हसत औरंगजेबाकडे बघत होते. त्यामुळे क्रूर राजाने डोळे काढले आणि त्याचे हातही कापले गेले. हात कापल्याच्या दोन आठवड्यांनंतर दि.११ मार्च १६८९ रोजी संभाजींचा शिरच्छेद करण्यात आला. हिंदू सम्राट वीर संभाजी महाराज यांचे छिन्नविछिन्न शीर चौकाचौकात फिरवण्यात आले आणि मृतदेहाचे तुकडे तुकडे करून कुत्र्यांना टाकले गेले. शिवपुत्र संभाजी महाराज यांचे जीवन देश आणि हिंदुत्वासाठी समर्पित आहे. संभाजी महाराज बलिदान दिन म्हणजे ११ मार्च होय. हा दिवस त्यांच्या मृत्यूच्या दिवशी साजरा केला जातो. संभाजी महाराज स्वातंत्र्यासाठी मोठ्या लढाईला सामोरे गेले आणि शहीद झाले. त्यांच्या स्मृतीसाठी हा दिवस साजरा केला जातो.

!! बलिदान दिनी छ.संभाजी महाराजांना कोटी कोटी विनम्र अभिवादन !!

## सिंदीत उभारणार गतिमान टर्मिनल ;रेल्वे सोबत जेएनपीटीच्या करार

**सिंदीरेल्वे**-नागपूर विभागात तयार होणाऱ्या तिसऱ्या टर्मिनल साठी येथील ड्रायपोर्ट सोबत नुकताच रेल्वे प्रशासनाने करार केला आहे.त्यामुळे येथील युवकांना प्रचंड प्रमाणात रोजगार मिळण्याची शक्यता बळावली आहे.

येथे उभारल्या जाणाऱ्या ड्रायपोर्टचे काम सुरु आहे.चार महिन्यांपूर्वी मध्य रेल्वेने या प्रकल्पाच्या शेवटल्या टोकापर्यंत अंथरलेल्या रुळावरुन रेल्वेच्या वाहतुकीचे प्रात्यक्षिक घेण्यात आले होते.चार दशकांपूर्वी येथे परसोडी,डोरली आदी शिवारातील ६०० एकरात डीन इंडिया नामक भव्य प्रकल्प उभारल्या जाणार होता.पण,केंद्र सरकारनं १९९३ मध्ये तो रद्द केला होता. विदर्भ भूषण खास.नितीन गडकरी यांनी पुढाकार घेत २५० एकरात जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्टच्या सौजन्याने ड्रायपोर्ट उभारण्याचे २०१३ मध्ये जाहीर केले.येथून जगाच्या कानाकोपऱ्यात विशाल कंटेनर पोहचविण्यासाठी मल्टी मॉडेल लॉजिस्टिक पार्क उभारण्यास ज.ने.पो.ट्रस्टने मान्यता दिली आहे. त्या अनुषंगाने मध्य रेल्वेची मदत घेणे अनिवार्य झाले.त्यानुसार परवां,मध्य रेल्वेचे विभागीय व्यवस्थापक(नागपूर) आणि जेएनपीटीचे मुख्य कार्य पालन अधिकारी एम.के.वाठोरे यांनी एका करारावर स्वाक्षऱ्या केल्यात. त्या करारानुसार येथील प्रकल्पातून दरमहा ३० रॅकची वाहतूक अपेक्षित आहे.त्यातून ८-२२कोटीचा महसूल मिळेल असे सांगितल्या जाते.या उलाढालीत भरपूर मनुष्यबळ उपलब्ध करावे लागेल त्यामुळे येथील बेरोजगार युवकांना मोठ्या प्रमाणात रोजगार मिळण्याची संधी आहे.सदर प्रकल्प लवकर सुरु व्हावा,अशी जनतेची अपेक्षा आहे.

## मालेवाडा येथे क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या स्मृतिदिनानिमित्त अभिवादन

**चिमूर । प्रतिनिधी**

चिमूर तालुक्यातील जेतवन बुद्ध विहार, मालेवाडा येथे दि. १० मार्च २०२४ रोजी सकाळी ठीक ९.३० वाजता क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या स्मृतिदिनानिमित्त अभिवादनाचा कार्यक्रम संपन्न झाला.

क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला काजल ठवरे व भावना शेंडे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून दीपप्रज्वलन करून अभिवादन केले.याप्रसंगी प्रदिप मेश्राम यांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर प्रकाश टाकला. क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी कष्ट सोसून स्त्रियांना शिक्षणाचे दार उघडून दिले. आज स्त्रिया सर्व क्षेत्रात उंच भरारी घेत आहेत. ही सर्व किमया केवळ महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांमुळेच घडली. सावित्रीबाई फुले यांनी महिलांना शिक्षित केले. आज महिलांनी उमेद व ग्रामसंघ तथा बचत गटाच्या माध्यमातून मोठी प्रगती केली आहे. ही



सर्व किमया केवळ सावित्रीबाई फुले मुळेच घडली. महिलांनी सावित्रीबाई फुले यांचे विचार अंगीकृत करून सर्वत्र प्रगती करावी. सावित्रीबाई फुले यांचे विचार व कार्य सर्वांसाठी प्रेरणादायीच आहेत. अशा शब्दात मान्यवरांनी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचं स्मरण त्यांना अभिवादन केलं.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रदिप मेश्राम यांनी केले व आभार योगेश मेश्राम यांनी मानले. यावेळी भिमज्योती महिला मंडळ, बौध्द पंच कमेटी मालेवाडा तथा गावातील शेकडो नागरिक उपस्थित होते.

## लोकसभा निवडणुकीच्या कामातून आजारी शिक्षकांना वगळण्याची मागणी

**करमाळा :** आजारी असलेल्या व सेवानिवृत्ती जवळ आलेल्या शिक्षकांना तसेच शिक्षिकांना निवडणूक कामातून वगळावे या मागणीसाठी करमाळा तालुका प्राथमिक शिक्षक समन्वय संघटनेच्या वतीने करमाळा तहसील कार्यालयाला निवेदन देण्यात आले आहे.

निवेदनात म्हटले आहे की, शासनाच्या प्रत्येक कामात प्राथमिक शिक्षक अग्रेसर असतात, मात्र ज्या शिक्षकांना कॅन्सर, हृदयरोग, शुगर, किडनीचे आजार, पॅरेलेसिस असे आजार आहेत त्यांना लोकसभा निवडणुकीच्या कामातून वगळावे तसेच शिक्षिकांना देखील या कामातून वगळण्यात यावे.त्यातूनही निवडणुकीसाठी कर्मचारी वर्ग कमी पडल्यास महिला शिक्षकांना ज्या गावात कार्यरत आहेत त्याच गावात किंवा त्याच्या शेजारील गावात निवडणुकीचे काम देण्यात यावे .तसेच ज्या शिक्षकांनी बीएलओ म्हणून काम केले आहे अशा शिक्षकांचे मानधन अद्याप जमा झाले नाही हे मानधन त्वरित जमा करण्यात यावी अशी निवेदन देण्यात आले आहे. शिक्षक नेते हनुमंत सरडे, संतोष पोतदार, चंद्रकांत चोरमले, निशांत खारगे, प्रमोद काळे, शिवाजी खरात, दादासाहेब सोरटे, रामहरी ढेरे, महेश निकत तात्यासाहेब जगताप आदी उपस्थित होते.

# कर्मयोगी भाऊंनी आपल्या आयुष्यात राजकारणापेक्षा समाजकारणाला महत्व दिले-मा.मंत्री हर्षवर्धन पाटील

**पुणे**-माजी खासदार श्रद्धेय कर्मयोगी शंकररावजी पाटील यांच्या जन्मशताब्दी वर्षा निमित्ताने कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयामध्ये आयोजित कार्यक्रमामध्ये बोलताना राज्याचे माजी मंत्री व भाजप नेते हर्षवर्धन पाटील म्हणाले की भाऊंची एक वैचारिक बैठक होती. भाऊंनी आयुष्यामध्ये सर्व जाती धर्माच्या सामान्य माणसांना बरोबर घेऊन जाण्याचे सामाजिक कार्य केले आहे. कर्मयोगी भाऊंनी आपल्या आयुष्यात राजकारणापेक्षा समाजकारणाला जास्त महत्व दिले.यावेळी समाजभूषण डॉ.लक्ष्मण आसबे यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.माजी मंत्री हर्षवर्धन पाटील व मान्यवरांनी प्रथम भाऊंच्या समाधी स्थळाचे दर्शन घेऊन त्यांना अभिवादन केले.सुरुवातीस श्री.नारायणदास रामदास संगीत विद्यालयाचे प्रमुख जावीर सर व त्यांच्या समवेतील विद्यार्थी,शिक्षक यांनी भजन गायले .






हर्षवर्धन पाटील म्हणाले की ,भाऊंनी आपल्या आयुष्यामध्ये सर्व जाती धर्माच्या सामान्य माणसांना बरोबर घेऊन जाण्याचे सामाजिक कार्य केले आहे. जेथे राजकीय विषय आहेत तेथे राजकीय विषय मांडले जेथे सामाजिक विषय आहेत तेथे सामाजिक विषय मांडले आहेत. ही भाऊंच्या कर्तृत्वाची वेगळी छाप होती.१९५७ च्या संयुक्त महाराष्ट्र चळवळीमध्ये भाऊंनी आपली वैयक्तिक भूमिका मांडली होती,नंतर झालेल्या निवडणुकीत पश्चिम महाराष्ट्रात काँग्रेसचे केवळ सहा लोक निवडून आले होते त्यात सर्वाधिक बहुमताने भाऊ निवडून आले. कर्मयोगी भाऊंनी आपल्या आयुष्यात राजकारणापेक्षा जास्त समाजकारण केले. अनेकांचे संसार प्रपंच, आयुष्य उभे केले. भाऊंनी रचनात्मक विकासाचे काम करून शाश्वत विकास केला.या इंदापूरच्या भूमीत त्यांचे नाव कायम घेतले जाईल.भाऊंनी त्यांच्या आयुष्यात विजयाचा आणि पराभवाचा कधी विचार केला नाही.भाऊंनी स्वाभिमानाने सत्याचा नेहमी विचार केला.आज जागतिक महिला दिन असून या निमित्ताने सर्व माता-भगिनींना शुभेच्छा दिल्या.आज सर्व क्षेत्रात महिला भगिनी उल्लेखनीय कार्य करीत आहे.आपल्या संस्कृतीत स्त्रीला महत्वाचे स्थान आहे.मातृदेवो भव ही आपली संस्कृती आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष प्रदीप गारटकर म्हणाले की,आमच्या कुटुंबांचे भाऊ सोबत घनिष्ठ संबंध होते.कर्मयोगी भाऊंनी मला कायम मदत केली. इंदापूर तालुक्याच्या जडणघडणीत भाऊंचे मोठे योगदान आहे. मतदारसंघ, राज्य व देशपातळीवर राजकारण यावर भाऊंसोबत नेहमी चर्चा व्हायच्या.आमचे मार्ग वेगळे होते पण आमचे संबंध खूप चांगले होते.सर्व प्रश्नांची उकल कशी करता येईल असे भाऊंचे व्यक्तिमत्त्व होते.१९९२ मध्ये मी सर्वप्रथम नगराध्यक्ष झालो ते भाऊंच्या सहकार्याने झालो.कामधेनु परिवाराचे संस्थापक अध्यक्ष समाजभूषण डॉ. लक्ष्मण आसबे म्हणाले की,' कर्मयोगी म्हणजे जो कर्म करतो पण फळाची अपेक्षा ठेवत नाही असा व्यक्ती. भाऊ अखंड काम करत राहिले, समाजासाठी झिजत राहिले. १९५२ साली पहिली निवडणूक त्यांनी लढवली जवळपास सहा वेळा आमदार, मंत्री, खासदार सर्व पदे मिळाली पण वैराग्य वृत्ती चे एकमेव उदाहरण म्हणजे कर्मयोगी भाऊ. सर्व समाजाला तळागाळातील व्यक्तींना आपल्या सोबत जोडून घेण्याचे काम कर्मयोगी भाऊंनी केले.महाशिवरात्री म्हणजे जागृत राहणे छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती संभाजी महाराज, संत तुकाराम, स्वामी विवेकानंद असे किती तरी उदाहरणे देता येतील हे सर्व जागृत होते म्हणून ते युगपुरुष बनले. कर्मयोगी भाऊ सुद्धा आपल्या समाजासाठी,आपल्या माणसांसाठी,आपल्या मतदारसंघासाठी जागृत होते. कर्मयोगी भाऊंची वाट,पुढे हर्षवर्धनजी भाऊ चालवत आहेत. त्यांच्या कार्यावर कळस चढविण्याचे काम आदरणीय हर्षवर्धन भाऊ करत आहेत. हर्षवर्धन भाऊ कर्मयोगी यांचा राजकीयच नाही तर सामाजिक वारसा चालवत आहेत. भाऊची निवड सहकार क्षेत्रावरील सर्वोच्च पदावर झाली. तसेच महिला दिनानिमित्त बोलताना, जगात २०४ देश आहेत स्त्रीला पुजणारा भारत हा एकमेव देश आहे असे गौरव उद्गार काढले. प्रास्ताविकात प्राचार्य डॉ.जीवन सरवदे यांनी भाऊंच्या कार्याची माहिती देत, स्वर्गीय भाऊ यांच्यावर प्रेम करणारे आपण सर्व क्षेत्रातील मान्यवर असल्याचे सांगितले. यावेळी राष्ट्रवादीचे पुणे जिल्हा अध्यक्ष प्रदीप गारटकर, शिवसेनेचे नेते विशाल बोंद्रे,बहुजन मुक्ती पार्टीचे राष्ट्रीय महासचिव ड.राहुल मखरे व इतर मान्यवर उपस्थित होते .दरम्यान यावेळी भाजप युवा मोर्चा कोअर कमिटीचे प्रमुख राजवर्धन पाटील यांनी कर्मयोगी शंकररावजी पाटील यांच्या समाधी स्थळाचे दर्शन घेऊन अभिवादन केलेकार्यक्रमाचे सूत्रसंचालन रघुनाथ पन्हाळकर यांनी केले. तर आभार उपप्राचार्य प्रा. दत्तात्रय गोळे यांनी मानले.

# शरद पवार हे महाराष्ट्राच्या राजकारणावरील लागलेला कलंक

## भाजपा प्रदेश उपाध्यक्ष ॲड.धर्मपाल मेश्राम यांचा घणाघात

**नागपूर । प्रतिनिधी**

देशाचे गृहमंत्री श्री. अमित शाह यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरदचंद्र पवार) अध्यक्ष शरद पवार यांचे महाराष्ट्रातील जनतेने ओझे वाहिल्याचे विधान केले. ही बाब पूर्णतः समर्थनीय असल्याचे सांगत शरद पवार हे महाराष्ट्रातील राजकारण व १२ कोटी जनतेला लागलेला कलंक आहेत, अशी टिका भारतीय जनता पार्टीचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष ॲड. धर्मपाल मेश्राम यांनी पत्रकार परिषदेत केली. राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे प्रवक्त्यांनी केलेल्या केंद्रीय गृहमंत्री श्री. अमित शाह यांच्यावर केलेल्या टिकेचा ॲड. धर्मपाल मेश्राम यांनी पत्रकार परिषदेत चांगलाच समाचार घेतला. शुक्रवारी (ता. ८) धंतोली येथील टिळक पत्रकार भवन येथे आयोजित पत्रकार परिषदेत भाजपा प्रवक्ते श्री. चंदन गोसावी, महामंत्री श्री. रामभाऊ आंबुलकर व सौ अश्वनी जिचकार , माजी नगरसेवक श्री. सुनील हिरणवार उपस्थित होते.

शरद पवार हे देशाला सर्वाधिक काळ लाभलेले कृषिमंत्री आहेत. २००४ ते २०१४ या दहा वर्षाच्या कृषिमंत्री पदाच्या कार्यकाळात त्यांनी एकही शेतकरी हिताचे कार्य केले नसल्याचा आरोप ॲड. मेश्राम यांनी केला. वेदप्रकाश आर्य यांनी पवारांनी ७२ हजार कोटींची कर्जमाफी केल्याचे विधान केले. आर्य यांच्या विधानाचा समाचार घेताना ॲड. धर्मपाल मेश्राम यांनी ते ७२ हजार कोटी शेतकऱ्यांना मिळाले नसून शरद पवारांच्या अधिपत्याखालील मृतावस्थेत असलेल्या सहकारी



बँकांना पुनर्जीवित करण्यासाठी वापरले गेल्याचा घणाघात केला. १९९३ मध्ये तत्कालीन मुंबई महानगरपालिकेचे उपायुक्त गो. रा. खैरनार यांनी शरद पवारांचे संबंध दहशतवादी दाऊद इब्राहिम यांच्यासोबत असून त्यांनी सुधाकरराव नाईक यांना खुर्चीवरून खेचण्यासाठी मुंबईत दंगल घडविल्याचा आरोप केला. याउपर मुंबईचे तत्कालीन डीजीपी उल्हास जोशी यांनी शरद पवारांचे संबंध थेट दहशतवादी दाऊद इब्राहिम, हितेंद्र ठाकूर आणि पप्पू कलानी यांच्यासोबत असल्याबाबत मुंबई उच्च न्यायालयात पुराव्यासह शपथपत्र दाखल केले. गुन्हेगारी प्रवृत्तींना हाताशी घेऊन आपले राजकारण साधून घेण्याचे काम मागील ५० वर्षात शरद पवारांनी केल्याचा देखील आरोप ॲड. मेश्राम यांनी केला. १९९० दशकाच्या उत्तरार्धात आपले राजकीय गुरु यशवंतराव चव्हाण यांच्या पाठीत खंजीर खुपसून आमदार फोडून स्वतः मुख्यमंत्री झाले. २३ नोव्हेंबर १९९४ ला गोरगरीब गोवारी बांधवांच्या आंदोलनावर अमानुष गोळीबार करून ११४ गोवारी बांधवांचे हत्याकांड घडले. मुख्यमंत्री असताना गोवारी बांधवांच्या आंदोलनाची साधी दखल घेण्याची तसदी न घेणारे शरद पवार ११४ गोवारी बांधवांच्या हत्येस जबाबदार असल्याची देखील टीका ॲड. धर्मपाल मेश्राम यांनी केली. विश्वासघातकी, भ्रष्टाचारी, परिवारवादी, गुन्हेगारी प्रवृत्तीला हाताशी धरून स्वतःचा राजकीय स्वार्थ साधणाऱ्या शरद पवार यांची बाजू मांडताना त्यांचे प्रवक्ते देशाचे गृहमंत्री अमित शाह यांचेबद्दल बेताल वक्तव्य करत असतील तर भाजपा सहन करणार नाही, असा इशारा प्रदेश उपाध्यक्ष ॲड. धर्मपाल मेश्राम यांनी दिला.

# करकंब येथील श्री.ज्ञानेश्वर दुधाणे यांना राज्यस्तरीय पर्यावरण प्रेमी पुरस्कार प्रदान

## प्रत्येकाला आपलंस करणारे राजे शिव छत्रपती शिवाजी महाराज-मा.आमदार रामहरी रुपनवर

**सांगोला । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्यातील गडकोट किल्ले त्यांचे संवर्धन करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्यासाठी शिवशंभू संघटनेची स्थापना करण्यात आली.यातूनच किल्ले तोरणागडावर तोरणा विजय दिवस महाराष्ट्रातील विविध क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तींना व स्वयंसेवी संस्थांना विविध पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले.

सुरुवातीला तरुणांनी किल्ले तोरणावर जाऊन मुख्य दरवाजाला नारळाचे तोरण बांधून शिवरायांची पालखी गडांवर नेऊन विधिवत पूजा केली त्यानंतर मा..आमदार रामहरी रुपनवर , श्री.तुकाराम महाराज यांचे वंशज शिरीष महाराज मोरे, शिवशंभू चे संस्थापक महादेव पवार राजमुद्रा प्रतिष्ठान चे सिताराम धुमाळ आदी मान्यवरांच्या शुभहस्ते प्रतिमा पूजन आणि दीपप्रज्वलन करण्यात आले.

त्यानंतर पर्यावरण क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तींमध्ये करकंब येथील लेकीचं झाड आणि जागर टीमच्या माध्यमातून काम करणाऱ्या ज्ञानेश्वर दुधाणे यांना पर्यावरण प्रेमी पुरस्कार प्रदान करण्यात आला.त्यानंतर राजमुद्रा प्रतिष्ठान जाधववाडी,सुनीशा शहा, (सातारा)अतुल नाना माने(शंभू गौरव)शिव संदीप वाघ(नाशिक)जयराम शेळके (कृषिरत्न) संभाजी पाटील (समाजसेवक) शिवशासन गृप (आदर्श संस्था)दर्लिंग क्रिडा मंडळ आदींना पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले.यावेळी शिरीश महाराज मोरे,रामहरी रुपनवर यांनी मनोगत व्यक्त करत छत्रपती शिवाजी महाराजांनी केलेल्या हिंदवी स्वराज्याचा



इतिहास अतिशय. मोठा असून तरुण पिढीने राजांच्या कार्याचा वारसा जतन करत राजांचे विचार अमलात आणून जीवन कृतार्थ करावे.वर्षातून एकदोन वेळा तरी गड किल्ले पाहायला यावे म्हणजे शिवरायांच्या महान कार्यांची जाणीव तरुणांना झाल्याशिवाय राहणार नाही.असे सांगून ज्ञानेश्वर दुधाणे यांनी तरुणांनी ऐतिहासिक शस्त्रविद्या आत्मसात करावी, मैदानावरील खेळांना प्राधान्य देऊन शरीर संपदा कमवावी आणि सध्याच्या काळात शरीर संपदा हिच खरी श्रीमंती असणार आहे असे सांगितले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थापक अध्यक्ष महादेव पवार यांनी केले.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन प्रशांत परब यांनी केले तर गोरख भागाये यांनी आभार मानले.कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी शिवशंभू संघटनेचे तानाजी नागणे,राहुल रोकडे,संजय पवार,शरद ताड,सागर पवार, रविकांत घुले,सुदर्शन तरटे, प्रदीप शिंदे, गणेश कदम,रुपेश नलवडे,मयुर तुपे,या तरुण जवानांनी अधिक परिश्रम घेतले.

# चोपडी ग्रामपंचायतच्या वतीने महिला दिनाच्या निमित्ताने आशा वर्कर्स व अंगणवाडी सेविकांना विविध वस्तूंचे वाटप

**नाझरा । वार्ताहार**

जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने चोपडी ग्रामपंचायतच्या वतीने वित्त आयोगातील फंडातून आशा वर्कर व अंगणवाडी सेविकांना विविध वस्तूंचे वाटप करण्यात आले.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच मंगल सरगर उपस्थित होत्या.यावेळी व्यासपीठावर विविध कार्यकारी सोसायटीचे चेअरमन भिकाजी बाबर, हनुमान दूध उत्पादक संस्थेचे चेअरमन दगडू बाबर,ग्रामपंचायत सदस्य दिनकर बाबर,सचिन खळगे, श्रीमंत सरगर, ग्रामसेवक मच्छिंद्र मिसाळ आदी उपस्थित होते.आशा वर्कर यांना त्यांचे विविध प्रकारचे दप्तर ठेवण्यासाठी सहा आशा वर्कर यांना लोखंडी कपाट, स्टेशनरी साहित्य



वाटप करण्यात आले, त्याचबरोबर विविध ठिकाणी आशा वर्कर यांना सर्वेच्या निमित्ताने जावे लागते यासाठी छत्रीचे वाटप करण्यात आले.त्याचबरोबर चोपडी परिसरातील गणेश नगर, संगमनगर, सिद्धनाथ नगर व चौगुले वस्ती येथील सोनाली बाबर,सविता बाबर,शोभा जवंजाळ व सविता चौगुले यांच्या अंगणवाडींना दहा लिटर प्रमाणाचा प्रेशर कुकर देण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला सरपंच मंगल सरगर,बचत गटाचे अध्यक्ष मंगल बाबर,माजी ग्रामपंचायत सदस्या सारिका बाबर,वैशाली जरग व उषा बंडगर यांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. ग्रामपंचायतच्या वतीने महिलांनी मांडलेल्या विविध समस्यांवर चर्चा करण्यात आली. विविध समस्यांचे निराकरण कसे करता येईल याबाबत उपाययोजना सुचविण्यात आल्या. सोलापूर जिल्हा सहकारी मध्यवर्ती बँक शाखा चोपडी व ग्रामपंचायतच्या वतीने उपस्थित महिलांना पेढे वाटून जागतिक महिला दिनाच्या शुभेच्छा देण्यात आल्या. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी चोपडी ग्रामपंचायत कर्मचारी अमोल यादव, रामचंद्र ढोबळे यांनी परिश्रम घेतले. उपस्थितीतांचे आभार ग्रामसेवक मिसाळ यांनी मानले.

# चेतनसिंह केदार सावंत यांच्या प्रयत्नाने सांगोल्यासाठी दहा ट्रान्सफार्मर मंजूर

**सांगोला । प्रतिनिधी**

शेतीपंपाला पुरेशा दाबाने वीजपुरवठा व्हावा म्हणून जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्याकडे वारंवार केलेल्या पाठपुराव्यामुळे डीपीडीसी मधून सांगोला तालुक्यासाठी दहा ट्रान्सफार्मर मंजूर झाले असल्याची माहिती भाजपचे जिल्हाध्यक्ष जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांनी दिली.

शेतीला अखंडित वीजपुरवठा करण्यासाठी भाजपचे जिल्हाध्यक्ष जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार सावंत यांनी जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्याकडे वारंवार पाठपुरावा करून नवीन ट्रान्सफॉर्मर बसविण्याची मागणी केली होती. या मागणीला यश आले असून जिल्हा नियोजन समितीच्या (डीपीडीसी) बैठकीत सांगोल्यातील १० ट्रान्सफॉर्मर मंजूर करण्यात आले आहेत. सांगोला तालुक्यातील सपताळ मळा वासूद, महादेव लेंडवे वस्ती कडलास, कुंडलिक शिंदे वस्ती अकोला, गट नंबर १४५ खिलारवाडी, केदारवाडी वासूद, दिलीप कांबळे वस्ती आलेगाव , राजेश कांबळे वस्ती मेथवडे, बिरापुरी वासूद, राजेश संभाजी शिंदे वस्ती निजामपूर, ढगे डीपी सांगोला रोड वासूद या दहा अतिरिक्त ट्रान्सफॉर्मर बसविण्यात येणार आहेत अशी माहिती भाजपचे जिल्हाध्यक्ष चेतनसिंह केदार-सावंत यांनी दिली.



# जागतिक महिला दिनानिमित्त रनिंग स्पर्धेतील गूणवंताचा गूण गौरव संपन्न

**मानवत । प्रतिनिधी**

जागतिक महिला दिना निमित्त नेहरू युवा केंद्र व मानवत नगर पालिकेच्या संयुक्त विद्यमाने नारी शक्ती फिटनेस रन (५०० मीटर) स्पर्धा शुक्रवारी (दि.८) पार पडल्या.

नगर पालिका ते छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्या पर्यंत रनिंग स्पर्धा घेतली. स्पर्धेचे उद्घाटन मुख्याधिकारी तथा प्रशासक कोमल सावरे यांनी केले. यावेळी वसतिगृहाच्या गृहपाल सपना राऊत, संगीता राऊत, कालिदा जोंधळे, आयोजक स्नेहा वाघमारे, यांच्यासह विद्यार्थिनी उपस्थित होत्या स्पर्धेत अनुराधा



धनवे, सविता अवचार, आरती तुपसमुंद्रे यांनी अनुक्रमे प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक पटकावला यावेळी गूणवंत विद्यार्थीनीचा गूण गौरव करण्यात आला.

# पहाडी पारगाव येथील,तारकेश्वर महादेव मंदिरात महाशिवरात्री निमित्त आचार्य विठ्ठल महाराज शास्त्री यांचे काल्याचे किर्तन संपन्न

**वडवणी । प्रतिनिधी**

धारूर तालुक्यातील पहाडी पारगाव राजवाडा येथील,श्री.तारकेश्वर महादेव मंदिरामध्ये महाशिवरात्री निमित्त ब्रह्मचारी ह.भ.प.गुरुवर्य अरविंदबाबा गिरी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली शिवलीला अमृत ग्रंथ पारायण सोहळा व किर्तन सेवा आयोजित करण्यात आले होते शनिवार दि.०९ मार्च २०२४ रोजी ह.भ.प.आचार्य विठ्ठल महाराज शास्त्री श्री.क्षेत्र निळकंठेश्वर संस्थान वेदांत नगर यांचे काल्याचे सुश्राव्य कीर्तन संपन्न झाले पहाडी पारगाव राजवाडा स्मशानभूमीतील श्री.तारकेश्वर महादेव मंदिराचा जीर्णोद्धार गावातील ग्रामस्थांच्या



लोकवर्गणीतून करण्यात आला श्री.तारकेश्वर महादेव असे नामकरण करून मंदिराचा जीर्णोद्धार करण्यासाठी भूमिपूजन,पायाभरणी ज्यांच्या शुभहस्ते व मंत्र उच्चारण झाली ते आचार्य विठ्ठल महाराज शास्त्री यांनी किर्तन रुपी सेवा श्री.तारकेश्वर महादेवाच्या चरणी समर्पित केली राजवाडा स्मशानभूमी मधील मंदिर बांधून जीर्णोद्धार करून महाशिवरात्रीनिमित्त प्रथमच श्री. शिवलीला अमृत ग्रंथ पारायण सोहळा व कीर्तन सेवा आयोजित केली याचा पंचकोशीतील भाविक,भक्तांनी कथा व कीर्तनाचा आणि महाप्रसादाचा लाभ घेतला. शिवलीला अमृत ग्रंथ पारायण सोहळा व कीर्तन सेवा यशस्वी करण्यासाठी विशेष परिश्रम श्री.तारकेश्वर महादेव मंदिराचे विश्वस्त मंडळांनी व ग्रामस्थांनी घेतले.

# सकल मराठा समाजाची बैठक;परभणी लोकसभेला चारशे उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा निर्धार

**पाथरी । प्रतिनिधी**

मराठा योध्दा मनोज जरांगे पाटलांच्या मराठा आरक्षण लढ्यात सगेसोयरे अधिसुचनेचे रुपांतर अध्यादेशात करावे या साठी आता मराठा समाज आंदोलनाचा एक भाग म्हणून लोकसभा निवडणुकीत हजारो उमेदवार उभे करून ईव्हिएम मशीनच कोमात घालून निवडणुकाच होऊ द्यायच्या नाहीत या निर्यावर ठाम झाला असून शनिवार ९ मार्च रोजी पाथरी शहरातील शिक्षक कॉलनीतील जागृत हनुमान मंदिरात सकल मराठा समाजाची बैठक पार पडली यात पाथरी तालुक्याच्या प्रत्येक गावातून दोन ते तीन उमेदवार लोकसभा निवडणुकीत उभे करून जास्तित जास्त चारशे उमेदवारी अर्ज परभणी लोकसभा मतदारसंघात दाखल करणार असल्याचा ठराव सर्वानुमते संमत करण्यात आला.

मराठा आरक्षण आंदोलनात या पुर्वी ही पाथरी तालुक्याचे योगदान मोठे राहिले आहे. मागील सहा महिन्या पासून मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील हे मराठ्यांना पन्नास टक्केच्या आत कुनबी म्हणून आरक्षण द्या म्हणून आंदोलन करत आहेत. यात ६३ हजार कुनबी नोंदी सापडल्या देखील. मात्र यात सगेसोयरेची शासनाने अधिसुचना काढली आहे. या अधिसुचनेवर आता अध्यादेश काढून मराठा समाजाला न्याय देण्याची मागणी करत आहेत. त्यावर शासन उलटा डावटाकत पाटलांवर एसआयटी लावत विविध गुन्हे दाखल करत आहे. या मुळे संपुर्ण महाराष्ट्रातील मराठा समाजात संतापाची लाट पसरली असून मराठा समाज पहिल्या पेक्षाही जास्त आक्रमक झाल्याचे दिसुन येत आहे. जरांगे पाटलांच्या बैठकांना आता सभेचे स्वरुप येत आहे. याच आंदोलनाचा एक भाग म्हणून ऑक्टोबर महिण्यात तालुक्यातील चाटेपिंपळगाव ग्रामपंचायतीच्या वार्ड क्र २ मधील महिला राखीव जागे साठी पोटनिवडणुक लागली होती. या वेळी या गावातील मराठा समाजाने महिला राखिव असलेल्या या जागे साठी तब्बल २०३ तीन उमेदवारी अर्ज दाखल केले होते. या वेळी छाननी नंतर १५५ उमेदवारी अर्ज राहिल्याने आणि एवढ्या मोठ्या संखेतील उमेवार उभे असल्याने ही निवडणुक घेता येणार नाही असे पत्र निवडणुक आयोगाने जारी केल्याने चाटेपिंपळगाव ची पोटनिवडणुक रद्द झाली होती. या विषयीच्या बातम्या प्रिंट आणि इलेक्टॉनिक मिडिया मधून व्हायरल झाल्या नंतर आता हाच फॉर्म्युला मराठा समाज महाराष्ट्रात आणि



बाहेर प्रमुख उमेदवारां समोर वापरुन गणिमिकावा करणार असल्याचे सांगत असून या विषयी बैठका होऊन निर्णय घेत काटेकोर नियोजन करून जबाबदा-या दिल्या जात आहेत. पाथरी शहरातील शिक्षक कॉलनी येथील जागृत हनुमान मंदिरात शनिवारी दुपारी १२ वा सकल मराठा समाजाची बैठक संपन्न झाली त्यात शासनाने सगेसोयरे चा अध्यादेश त्वरीत काढावा अन्यथा एकाही पुढा-याला गावात प्रवेश दिला जाणार नाही. जो पर्यंत सगेसोयरे अद्यादेश पारीत होत नाही तो पर्यंत कोणत्याही पक्षाच्या नेत्याला भेटायच नाही. असे निर्णय घेत प्रत्येक गावातून लोकवर्गणी करून दोन ते तीन उमेदवारी अर्ज परभणी लोकसभेला भरणार असल्याचा ठराव ही या वेळी पारित करण्यात आला. या सोबतच मनोज जरांगे पाटील हे १० मार्च रविवार रोजी सायंकाळी सात वाजता मानवत येथे सकल मराठा समाजाची बैठक घेण्यासाठी येत आहेत या बैठकीला पाथरी शहरा सह गावागावातील मराठा समाज बांधवांनी हजारोंच्या संखेने उपस्थित राहाण्याचे आवाहन सकल मराठा समाजाच्या वतीने करण्यात आले आहे. निवडणुक अर्जा साठी लागणारे नियोजन प्रत्येक जि प,पं स गट आणि गणात केले जाणार आहे. लोकसभेला उमेदवारी अर्ज भरण्या साठी मराठा समाजाती वकील मंडळी संपुर्ण सहकार्य करणार असल्याचे या वेळी सागण्यात आले. या बैठकी साठी मराठा समाजातील विविध क्षेत्रात काम करणारी मंडळी उपस्थित होती. शेवटी आरक्षणाच्या समर्थनार्थ प्रचंड घोषणाबाजी करण्यात आली आणि राष्ट्रगिताने या सकल मराठा समाजाच्या बैठकीची सांगता करण्यात आली.

सह्याद्रीचा राखणदार



### शिंदे, अजित पवारांना वेगळीच काळजी

# महायुतीत जागा कमी मिळाल्यास पक्षात नाराजी पसरून सहकारी साथ सोडण्याची भीती


**मुंबई–**राज्यातील सत्ताधारी महायुतीच्या जागावाटपाचा तिढा अजून सुटला नाही. या मुद्यावर शुक्रवारी रात्री उशिरापर्यंत दिल्लीत चर्चा झाली. पण तोडगा निघाला नाही. त्यामुळे महायुतीच्या नेत्यांत आणखी एक बैठक होऊन जागावाटपावर मतैक्य करण्याचा प्रयत्न होणार आहे. तूर्त जागावाटपात किरकोळ जागा मिळाल्या तर पक्ष संघटनेत नाराजी पसरून अनेक नेते घरवापसी करतील, अशी भीती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वातील शिवसेना व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वातील राष्ट्रवादी काँग्रेसला वाटत आहे. यामुळे या दोन्ही नेत्यांची काळजी दिवसागणिक वाढत आहे.



महायुतीच्या जागावाटपावर नुकतीच मुंबईत एक बैठक झाली होती. पण त्यात कोणताही तोडगा निघाला नाही. त्यामुळे शुक्रवारी रात्री केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या उपस्थितीत दिल्लीत बैठक झाली. पण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, सुनील तटकरे, प्रफुल्ल पटेल यांच्या उपस्थितीत झालेली ही बैठकही निष्फळ ठरली. यामुळे हे नेते पुन्हा एकदा चर्चेच्या टेबलावर बसून जागावाटपाचा तिढा सोडवण्याचा प्रयत्न करणार आहेत.सूत्रांच्या माहितीनुसार, २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत भाजपने २५ जागा लढवल्या होत्या. त्यात त्यांचा सर्वाधिक २३ जागांवर विजय झाला होता. त्यामुळे भाजपला यावेळी सर्वाधिक ३२ ते ३५ जागा हव्या आहेत. यासाठी त्यांनी एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला व अजित पवारांच्या राष्ट्रवादीला एकेरी आकड्याच्या मोजक्या जागा देण्याचा प्रस्ताव ठेवला आहे. यामुळे या दोन्ही नेत्यांची चिंता वाढली आहे.भाजपने शिवसेना व राष्ट्रवादीपुढे केवळ जिंकू शकणाऱ्या जागा देण्याचा प्रस्ताव ठेवला आहे. त्यांचा हा प्रस्ताव मान्य केला तर पक्ष संघटनेत नाराजी पसरेल. त्यानंतर पर्यायाने अनेक नेते व कार्यकर्ते साथ सोडून पुन्हा शरद पवार व उद्धव ठाकरे यांच्याकडे घरवापसी करतील, अशी भीती एकनाथ शिंदे व अजित पवार यांना वाटत आहे. विशेषतः भाजपने आपल्या मित्रपक्षांच्या काही उमेदवारांना भाजपच्या निवडणूक चिन्हावर निवडणूक लढवण्याची संधी देण्याचाही प्रस्ताव ठेवल्यामुळेही दोन्ही पक्षाच्या कार्यकर्त्यांत प्रचंड नाराजी पसरली आहे, असा दावा सूत्रांनी केला आहे.दुसरीकडे, आगामी लोकसभा निवडणुकीत भाजपने राज्यातील ४८ पैकी ४५ हून अधिक जागा जिंकण्याचे उद्दीष्ट ठेवले आहे. गत निवडणुकीत भाजपने छोट्या मित्र पक्षांची काळजी घेतली होती. पण यावेळी या पक्षांच्या हाती काहीही न लागण्याची शक्यता आहे. यामुळे हे पक्षही भाजपकडून आपल्या खिशात १-२ जागा मिळवण्याच्या प्रयत्नांत आहेत. दरम्यान, रामदास आठवले यांच्या रिपाइं(आ)ने २, नवनीत राणा यांच्या युवा स्वाभिमान पक्षाने १ व महादेव जानकर यांच्या रासपने भाजपकडे एका जागेची मागणी केली आहे.

# ‘पाणी प्रश्नी उंटावरून शेळ्या हाकण्यापेक्षा प्रत्यक्षात पाहणी’ -प्रणिती शिंदे

**मंगळवेढा :** मंगळवेढ्याचा पाणी प्रश्न विधानसभेत उपस्थित केल्यानंतर उंटावरून शेळ्या हाकण्यापेक्षा प्रत्यक्षात पाहणी करण्यासाठी या भागात आले असून पाण्यासाठी निश्चित पाठपुरावा करू अशी ग्वाही आमदार प्रणिती शिंदे यांनी भाळवणी येथे बोलताना दिली.



तालुक्यातील दुष्काळ पाहणीच्या निमित्ताने त्यांनी दक्षिण भागातील येड्राव, खवे, जित्ती , निंबोणी, भाळवणी, हिवरगाव, खुपसंगी, जुनोनी,गोणेवाडी, लक्ष्मीदहिवडी, आंधळगाव, गणेशवाडी, शेलेवाडी, अकोला,कचरेवाडी, येथील ग्रामस्थांची संवाद साधला.या दौऱ्यात त्यांच्या समवेत धनश्री परिवाराचे शिवाजीराव काळुंगे, सुरेश कोळेकर,तालुकाध्यक्ष प्रशांत साळे,शहराध्यक्ष राजेंद्र चेळेकर,पांडुरंग जावळे,पांडुरंग माळी, शहराध्यक्ष मनोज माळी, युवक तालुकाध्यक्ष ॲड रविकरण कोळेकर, पांडुरंग निराळे,शिवशंकर कवचाळे,मारुती वाकडे ,अजय अदाटे, बापू अवघडे, नाथा ऐवळे, सुनीता अवघडे , महादेव शिंदे पंडित माने, नामदेव चौगुले,सिताराम भगरे, काशिनाथ सावंजी,धनाजी चव्हाण,विष्णू भंडगे उपस्थित होते.यावेळी बोलताना आ.शिंदे म्हणाल्या की,एखादा प्रश्न उपस्थित करणे व त्यासाठीचा पाठपुरावा सोडून देणे, त्यासाठी शो करणे एवढ्या पुरते गप्प न बसता तो प्रश्न चिकाटीने सोडवला पाहिजे या भूमिकेतून मी काम करत आहे मला राजकारणापेक्षा समाजकारणात व लोकांची कामे करण्यात अधिक रस आहे.त्यावर मी समाधानी आहे सध्याचे सरकार ठेकेदाराच्या जीवावर काम करते त्यामुळे त्यांना लोकांच्या प्रश्नांची काही देणे घेणे राहिले नाही. माझ्याकडे कोणताही कारखाने अथवा संस्था नाही त्यामुळे ईडी वगैरे माझ्याकडे येण्याचा प्रश्न नाही.मी सत्ताधारी व पंतप्रधानाच्या विरोधात प्रकटपणे बोलते. धनश्री परिवाराचे शिवाजीराव काळुंगे म्हणाले की,केंद्रात सरकार कुणाचे येऊ द्या मात्र या मतदारसंघातील प्रश्न भांडणारा लोकप्रतिनिधी निवडून जाणे आवश्यक आहे या मतदारसंघातील प्रश्नांची जाण ठेवून लोकसभेत आवाज उठवणारा लोकप्रतिनिधी निवडला पाहिजे.आ.प्रणिती शिंदे या संघर्ष करणाऱ्या नेत्या असल्यामुळे शहर मध्ये त्या सलग तीन वेळा निवडून आल्या. एका चुकीची शिक्षा दहा वर्षे भोगत आहे. सरपंच लक्ष्मण गायकवाड म्हणाले की सध्या कडब्याला जिल्हाबंदी असल्यामुळे शिवारात चारा पडून आहे तोच चारा शासनाने खरेदी करून दुष्काळी भागातील जनावराला द्यावा अशी देण्याबाबत मागणी केली यावेळी काशिनाथ सावजी, महादेव शिंदे, महादेव साखरे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

# गुणरत्न सदावर्तेंना भाजप देणार तिकिट? ’या’ जागेची आहे चर्चा


**सोलापूर :**लोकसभा निवडणुकीचे वारे देशात जोरदार वाहू लागले आहेत. राज्यातील प्रमुख जागांवर महायुती, महाविकास आघाडीत खलबते सुरू असताना, सोलापूरच्या जागेबद्दलही चढाओढ सुरू आहे.



भाजपकडून इच्छुक असलेल्या उमेदवारांची नावे पुढे येत असताना, प्रसिद्ध वकील गुणरत्न सदावर्ते यांना सोलापुरातून उमेदवारी दिली जाण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. भाजपकडूनच सदावर्ते यांच्या नावाचा विचार केला जात असल्याचे समजते. सोलापुरात महाविकास आघाडीच्या उमेदवार प्रणिती शिंदे मैदानात उतरणार आहेत. सोलापूर लोकसभा मतदारसंघासाठी भाजपकडून अद्याप उमेदवार निश्चित झालेला नाही.सोलापुरातील तेलगू भाषिकांचा प्रभाव पाहता मूळचे तेलगू भाषिक असलेल्या सदावर्ते यांना उमेदवारी देण्यासंदर्भात भाजपने विचार सुरू केला आहे.मराठा आरक्षणाचा मुद्दा, एसटी आंदोलनावरून ते चांगलेच चर्चेत आले होते. दलित, ओबीसी मते खेचून आणण्यात सदावर्ते यशस्वी होऊ शकतील, असा भाजपचा होरा दिसून येत आहे. हा प्रयोग यशस्वी झाल्यास आगामी विधानसभा आणि महापालिका निवडणुकीतही भाजपला याचा फायदा होऊ शकतो.

# तुरुंगात कैद्यांच्या क्षमतेपेक्षा चौपट गर्दी सोलापूर मध्यवर्ती कारागृहात ४३१ कैदी

**सोलापूर :** येथील मध्यवर्ती कारागृहात घरफोडी, खून, हाणामारी, महिला अथवा तरुणीवर अत्याचार, विनयभंग, चोरी-दरोडा अशा विविध गुन्ह्यांतील तब्बल ४३१ कैदी आहेत. त्यात महिला कैद्यांचाही समावेश आहे. वास्तविक पाहता या कारागृहाची क्षमता अवघी १४१ कैद्यांचीच आहे.



दरवर्षी साधारणतः गुन्हेगारीत १० टक्के वाढ होते. किरकोळ कारणातूनही अनेकजण कायदा हातात घेऊ लागले आहेत. नात्यांचा विसर अनेकांना पडला असून, छुल्लक कारणांसाठी काहींनी स्वत:च्या आई-वडिलांचा, आजीचा देखील खून केल्याची उदाहरणे आहेत. दरम्यान, पोलिसांनी वेगवेगळ्या गुन्ह्यात अटक केल्यानंतर न्यायालयातून शिक्षा होईपर्यंत कैदी सोलापूरच्या मध्यवर्ती कारागृहात ठेवले जातात.सध्या सोलापूर कारागृह कैद्याने तुडुंब भरल्याने अनेक कैदी न्यायालयाच्या आदेशाने कोल्हापूरच्या मध्यवर्ती कारागृहात देखील पाठविण्यात आले आहेत. खटल्याचा निकाल झाल्यावर शिक्षा लागलेल्या कैद्यांची रवानगी पुण्यातील येरवडा कारागृहात केली जाते.सोलापूर शहर-जिल्ह्यातील विविध गुन्ह्यांतील ४३१ कैदी मध्यवर्ती कारागृहात कैद आहेत. दरम्यान, आता शासनाकडून निधी मिळाल्यानंतर तुरुंगाचा विस्तार केला जात असून, हे काम पूर्ण झाल्यावर त्याठिकाणी २४० कैदी आणखी बसू शकणार आहेत. तुरुंगात राहण्यापेक्षा गुन्हा न करता, किंवा कायदा हातात न घेता प्रत्येकानी आनंदाने राहावे, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात येत आहे.सोलापूर मध्यवर्ती कारागृहात एकूण ३९ महिला कैदी असून, त्यातील एका महिला कैद्याकडे लहान बाळ देखील आहे. सहा वर्षांपर्यंतच्या चिमुकल्याला महिला कैदी स्वत:जवळ ठेऊ शकते. तुरुंगात महिला कैद्यांची व्यवस्था स्वतंत्र असते. कैद्यांच्या नातेवाइकांना भेटण्यासाठी मुभा दिली जाते, पण त्यासाठी तुरुंग प्रशासनाची रीतसर परवानगी घ्यावी लागते.

# शहरात उच्चांकी ३९.४ अंश सेल्सिअस तापमान सोलापुरात पहाटे थंडी, दिवसा उन्हाचे चटके

**सोलापूर :** सोलापूर शहर व परिसरातील वातावरण सध्या विचित्र झाले आहे. पहाटे व रात्रीच्या सुमारास थंडी आणि दिवसा उन्हाचा तडाखा असे वातावरण झाले आहे. गेल्या दोन दिवसांपासून सोलापूर शहर व परिसरात यंदाच्या उन्हाळ्यातील उच्चांकी तापमानाची नोंद होत आहे.

शुक्रवारी ३९.१अंश सेल्सिअसनंतर आज शनिवारी ३९.४ अंश सेल्सिअस तापमानाची नोंद आज सोलापूर शहर व परिसरात झाली.उन्हाचा तडाखा दिवसेंदिवस वाढत असल्याने दुपारच्या सुमारास बाहेर पडणे शक्यतो नागरिक टाळू लागले आहेत.मार्च महिन्याच्या सुरवातीस तापमानाचा पारा चाळीस अंश सेल्सिअसच्या दरम्यान राहू लागल्याने आणखी एप्रिल व मे महिन्यात तापमानाचा पारा कुठपर्यंत जाईल? याचा अंदाज व्यक्त करूनच आगामी उन्हाळ्याबद्दल चिंता व्यक्त केली जात आहे.दुपारच्या उन्हाच्या तडाख्याच्या उष्ण झळा सूर्यास्तानंतरही जाणवत आहेत. उन्हापासून बचाव करण्यासाठी गॉगल्स, टोप्या, पांढरे रुमाल, पांढरे कपडे घालण्याचे प्रमाण वाढताना दिसत आहे. थंडी व उन्हाचा तडाखा यामुळे सर्दी, खोकला, ताप, अंगदुखी या सारखे विकार उद्भवताना दिसत आहेत.उन्हाचा तडाखा वाढला तरीही शरीरातील पाण्याची पातळी कमी होऊ नये यासाठी, वारंवार पाणी पिण्याचा सल्लाही डॉक्टरांनी दिला आहे. सोलापूर शहर व परिसरात होळीनंतर उन्हाची तीव्रता वाढत असल्याचा आजपर्यंतचा अनुभव आहे. यंदा होळीपूर्वीच उन्हाचा तडाखा वाढू लागला आहे. या वर्षी पाऊस कमी झाल्याने टंचाईच्या झळा अधिक प्रखरतेने जाणवण्याची शक्यता आहे.भारतीय हवामान विभागात व्यक्त केलेल्या अंदाजात सोलापूर शहर व परिसरात १४ मार्चपर्यंत उन्हाचा तडाखा कायम राहील असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. १० व ११ मार्च रोजी सोलापूरच्या तापमानाचा पारा ४१ अंश सेल्सिअसच्या दरम्यान तर १२ व १३ मार्च रोजी तापमानाचा पारा ४२ अंश सेल्सिअसच्या दरम्यान राहील असाही अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. १४ मार्च रोजी सोलापूरच्या तापमानाचा पारा ४० अंश सेल्सिअसच्या दरम्यान राहील असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

# मोहोळ विधानसभा मतदारसंघात होणार नवीन २९ तलाठी कार्यालये

**मोहोळ –** मोहोळचे आमदार यशवंत माने यांनी विविध गावचे रस्ते, समाज मंदिरे व अन्य विकास कामावर मोहोळ विधानसभा मतदार संघात मोठ्या प्रमाणात निधी खेचून आणला आहे. त्यांनी आता महसूल विभागाकडे लक्ष केंद्रित केले असून, मोहोळ तालुक्यातील १९ व मतदार संघातील इतर गावासाठी १० ठिकाणी तलाठी कार्यालय बांधण्यासाठी महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे परवानगीसह निधीची मागणी केली असल्याची माहिती त्यांनी दिली. तलाठी म्हणजे महसूल विभागाचा ग्रामीण भागातील भक्कम पाया आहे. शेतकऱ्याची प्रत्येक गोष्ट तलाठ्यावर अवलंबून आहे. त्यात सातबारा उतारे ८अ चे उतारे तसेच इतर विविध दाखल्यासाठी त्यांच्याकडे जावे लागते. तसेच विविध महसुली प्रकरणे, पीक पाणी नोंदी हे त्यांच्यावरच अवलंबून आहे. अशा तलाठ्यासाठी त्यांना स्वतंत्र कार्यालय नाही. त्यामुळे अडचणी येतात.सोलापूरचे तत्कालीन जिल्हाधिकारी रत्नाकर गायकवाड यांच्या कार्यकाळात ४७ ठिकाणी तलाठी सजे होते. त्यानंतर त्याचे विस्तारीकरण होऊन ५५ झाले. सध्या अनेक तलाठी कार्यालये ही ग्रामपंचायतीच्या, विविध कार्यकारी सोसायटीच्या जागेत आहेत.तालुक्यात सध्या २८ ठिकाणी ग्रामपंचायत व इतर विभागाच्या शासकीय जागेत कार्यालय सुरू आहेत. मात्र १९ ठिकाणी कार्यालय नाहीत. स्वतंत्र तलाठी कार्यालय झाली तर उपजिल्हाधिकारी तहसीलदार,मंडल निरीक्षक यांच्या सारख्या अधिकाऱ्यांना त्या ठिकाणी येऊन काही अडचणीचे प्रश्न सोडविण्यास मदत होणार आहे.आमदार माने यांनी महसूल मंत्री विखे-पाटील यांच्याकडे तलाठी कार्यालयाच्या बांधकाम व निधीची मागणी करताच कक्ष अधिकाऱ्या कडून सोलापूरच्या जिल्हाधिकार्यांना तशा आशियाचे पत्र प्राप्त झाले असून, त्यात वस्तुस्थितीची माहिती व तपासणी करण्याच्या सुचना दिल्या आहेत.

# शिवसेना उपजिल्हाप्रमुख पदी गजानन मुडेगावकर



**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

येथील शिवसेना नेते गजानन मुडेगावकर यांची मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे साहेब यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेच्या उप जिल्हा प्रमुख पदी निवड झाली असुन या निवडीचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे

गजानन मुडेगावकर यांची पत्रकारिते बरोबर च कट्टर शिवसैनिक म्हणून ओळख आहे, अंबाजोगाई शहर व तालुक्यातील शिवसेना पक्ष वाढीसाठी त्यांचे मोठे योगदान मानले जाते पुर्वी ते उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेत अंबाजोगाई शहर प्रमुख म्हणून चांगले कार्य केले होते परंतु हिंदुत्वाचा पुरस्कार व हिंदुर्हदय सम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारां वर चालणार्या मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या नेतृत्वाखाली काम करण्याचे त्यांनी ठरवले व काही दिवसांपूर्वी त्यांनी मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या उपस्थितीत वर्षा निवासस्थानी शिवसेनेत प्रवेश केला होता त्यानंतर आज त्यांची मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे,खा.श्रीकांत शिंदे,सचिव संजय मोरे यांच्या आदेशानुसार शिवसेना सचिव विशाल थोरात,शिवसेनेचे कार्यालयीन प्रमुख साळुंके ,संपर्क प्रमुख पाटील व जिल्हा प्रमुख सचीन भैय्या मुळूक,ॲड.वैजनाथ वाघमारे यांच्या उपस्थितीत नियुक्ती पत्र देण्यात आले हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे व मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांचे विचार सर्वसामान्यांपर्यंत पोहचविणार तसेच शिवसेना पक्ष वाढीसाठी प्रयत्न करणार असल्याची प्रतिक्रिया नियुक्ती नंतर गजानन मुडेगावकर यांनी दिली.

# पोलिस भरतीचा फॉर्म भरता येईना ;मराठा विद्यार्थ्यांनी अनिल जगताप यांच्याकडे मांडल्या व्यथा

## शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल जगताप यांना दिले निवेदन

**बीड । प्रतिनिधी**

राज्य सरकारने मराठा समाजाला १० टक्के आरक्षण दिल्याचे जाहीर केले. नोकर भरतीमध्ये सुधारित बिंदुनामावलीही जारी करण्यात आली आहे. परंतु अद्यापपर्यंत सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्गाचे एसईबीसी प्रमाणपत्र देण्यास सुरुवात झाली नाही. परिणामी, नव्याने दिलेल्या १० टक्के आरक्षणानुसार बीडमधील तरुणांना पोलिस भरतीचा फॉर्म भरता येईना झाला आहे. त्यामुळे असंख्य मराठा तरुणांनी शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप यांच्यासमोर शुक्रवारी आपली कैफियत मांडून त्यांच्याच माध्यमातून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना निवेदन दिले.



२० फेब्रुवारीला विधीमंडळाच्या विशेष अधिवेशनात मराठा समाजाला १० टक्के आरक्षण देणारे विधेयक एकमताने मंजूर केले होते. नंतर २६ फेब्रुवारीला विधि आणि न्याय विभागाने शासन राजपत्र प्रकाशित केले. त्यानुसार सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्गात समावेश झालेल्या मराठा समाजाला शिक्षण आणि सरकारी सेवेत १० टक्के आरक्षण लागू झाले आहे. नोकर भरती आणि शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशासाठी २७ फेब्रुवारी रोजी सुधारित बिंदूनामावलीही जारी केली आहे. असे असले तरी अद्याप एसईबीसी प्रमाणपत्र दिले जात नसल्याने अर्ज भरण्यास अडचणी आहेत.पोलिस भरतीची जाहिरात ५ मार्च रोजी प्रसिद्ध झाली असून, त्यासाठी अर्ज दाखल करण्याची शेवटची तारीख ३१ मार्च आहे. ऑनलाइन अर्ज भरताना एसईबीसी हा पर्याय येत आहे. या पर्यायावर क्लिक केले असता त्यामध्ये एसईबीसी प्रमाणपत्राची तारीख, प्रमाणपत्र वितरित करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव विचारले जात आहे. प्रमाणपत्र मिळाले नसल्याने एसईबीसीमधून अर्ज भरता येत नाही, असे उमेदवारांचे म्हणणे आहे. पर्याय नसल्याने भरतीसाठी इच्छुक असलेल्या उमेदवारांना खुल्या प्रवर्गातून अर्ज दाखल करावा लागत आहे. ज्या मराठा तरुणांकडे कुणबी प्रमाणपत्र आहे त्यांना ओबीसीमधून अर्ज भरता येत आहे. परंतु, ज्यांच्याकडे एसईबीसीचे प्रमाणपत्र नाही त्यांना अडचण येत आहे. एसईबीसी प्रमाणपत्र नसल्याने उमेदवारांना पोलिस भरतीचा फॉर्म भरता येत नाही. असंख्य मराठा तरुणांनी शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल जगताप यांच्यासमोर आपली समस्या मांडली. तसेच कुणबी नोंद मिळाली आहे. अद्याप कुणबी प्रमाणपत्र मिळाले नसल्याने पोलिस पदासाठी अर्ज भरता येत नाही. या निवेदनाचा स्वीकार करत आपण स्वतः याबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासमोर ही बाब मांडणार असल्याचे जगताप यांनी तरुणांना आश्वासन दिले. यावेळी शिवसेनेचे संतोष जाधव, विनोद चव्हाण यांच्यासह इतर उपस्थित होते.

सह्याद्री चा राखणदार दैनिक वृत्तपत्र मालक ,प्रकाशक मारोती नारायण घुमे यांचे करिता संपादक आशिष मारोती घुमे यांनी मुद्रक सुरज भक्तराज घुमे सहयाद्री मल्टी सर्व्हिसेस, कर्मवीर वॉर्ड वरोरा(४४२९०७ ) येथून मुद्रीत करून मातृछाया भवन कर्मवीर वॉर्ड, वरोरा (४४२९०७)येथून प्रकाशित केले आहे . यातील प्रकाशित मजकुराशी संपादक सहमत असेलच असे नाही .यातील मजकुरांवर आक्षेप झाल्यास त्याचे निवारण वरोरा न्यायालया अंतर्गत होईल.
Sahyadri Cha Rakhandar Daily Newspaper Owner Publisher Maroti Narayan Ghume Editor Ashish Maroti Ghume Printer Suraj Bhaktaraj Ghume Sahyadri Multi Services, Karmaveer Ward Warora.(442907) The editor does not necessarily agree with the content published herein. Objections to the content shall be redressed under the warora Courts. .